**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 3 | Nov 2014**
**ISSN:- 2393-8900**

**Research Article**

# *भारतीय जातीयव्यवस्थेचा इतिहास*

***बिभीषण अर्जून रणदिवे***

शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर जि.सोलापूर.

***सारांश :-***

जगातील सर्वच मानवी समाजांचा अभ्यास केला असता असे आढळून येते की, मानवी समाजात नैसर्गिक किंवा मानवनिर्मित अशा काही घटकांच्या आधारावर मानवाचे उच्च–नीचतेचा अनुषंगाने विभाजन झालेले आढळून येते. म्हणजेच जगाच्या पाठीवरील सर्वच समाजात सामाजिक विषमता प्रत्येक काळात विद्यमान होती. एशियन समाजाबरोबरच आफ्रिकन, युरोपियन, खंडातील समाजातही श्रेष्ठ–कनिष्ठतेची भावना असल्याचे आढळते.

## ***प्रस्तावना :-***

एकंदर जगाच्या इतिहासाकडे पाहता मानवी समाजात विषमता निर्माण करण्यास अर्वाचीन काळी गुलामगिरी आणि धार्मिक सत्ता अत्यंत अग्रेसर होत्या हे फ्रेंच राज्यक्रांतीनेही जगाच्या लक्षात आणून दिले आहे. म्हणजे जगातील संपूर्ण समाजावर गुलामगिरी आणि धर्मसत्तेच्या नावावरच मनुष्य जातीला काळिमा लावणा–या अनेक घटना मानवी इतिहासामध्ये अजरामर आहेत. आजच्या अमानुष, निर्दयी, व काळीज नसलेल्या सामाजिक व्यवस्थेचा उगम ख–या अर्थाने अर्वाचीन मानवी समाजात असलेल्या गुलामगिरी आणि धार्मिक सत्तेतून झाला असल्याचे दिसून येते. वर्णद्वेषी गुलामगिरी एकूण जगातील सर्वच खंडात (आशिया, युरोप आफ्रिका, अमेरिकेसह) प्राचीन काळापासूनच विद्यमान आहे. गुलामगिरीच्या संबंधी डॉ. पी.व्ही.काणे यांनी आपल्या Histroy of Dharmashastra Vol No.1, part No. मध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे. Slavery has existed as a constant element in the social and economical life of all nations of antiquity such as Babylon, Egypt, Greece, Rome and also of many nations of Europe.

जगतिक सामाजिक विषमता आणि भारतीय समाजव्यवस्था याचा विचार केला असता, भारत हा पूर्वीपासून बाह्य लोकांचे आश्रयस्थान राहिला आहे. आर्यापासून परकीय लोकांनी आक्रमणे करुन प्रस्थापित समाजव्यवस्था संस्कृती नष्ट केली. भारतातील दोन वंशिक गटाचा उल्लेख डॉ. बाबासाहेबांनी आपल्या Writing and speeche Vol : 7 मध्ये केला आहे. (The race of India is that have been at the most only two race in the field, the Aryans and the Nagas (Dravid) संघर्ष होऊन आर्यांनी येथील मूळ निवासींना पराभूत करुन त्यांना दास, दस्यु, गुलाम, अस्पृश्य बनविले. म्हणून बाबासाहेब म्हणतात वास्तविकतः लक्षात घेतल्यास आपणास असे म्हणता येईल की, भारतातील हिंदू समाजात गुलामगिरीची पध्दत फार जुनी असून तिचा मनुस्मृती मध्येही उल्लेख आढळतो. परंतु भारतातील ही अस्पृश्यता अत्यंत दाहक होती. अशा दुर्लक्षित चांडाळ, पुल्कस, अस्पृश्य गणल्या गेलेल्या दुर्लक्षित अशा समाजघटकाबद्दल Dr. Kelkar यांनी आपल्या History of case in India या ग्रंथात म्हटले आहे की, प्राचीन काळी गुणकर्मानुसार चार्तुवर्ण्यव्यवस्था निर्माण करुन चांडाल दास, दस्यु, अस्पृश्य यांचेवर अनेक बंधने घालून अनावश्यक धार्मिक आदर्शाचे पाठ शिकवून अनुपयोगी कल्पनांच्या साहाय्याने त्यांचे जीवन जखडून ठेवलेले दिसून येते. अस्पृश्यतेची स्थिती फक्त भारतातच होती असे नाही तर पाश्चिमात्य देषातही याचा प्रत्यय दिसून येतो.

भारतासह जागतील बहुतांशी देशात गुलामगिरी आणि अस्पृश्यता ही जगातील गुलामगिरी पेक्षा अत्यंत दाहक, जाचक त्रासिक होती. ह्या व्यवस्थेद्वारे माणसाचं माणूसपणा समाजातील समाजातील श्रेष्ठीजणाद्वारे हिरावले जायचे. म्हणूनच विठ्ठल रामजी शिंदे हे आपल्या, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या ग्रंथात म्हणतात की, जगातील इतर देशासारखी अस्पृश्यता भारतातही आहे. परंतु इतर देशातील अस्पृश्यता आणि भारतातील अस्पृश्यता यात जमीन–अस्मानचे अंतर आहे. त्यांचे मते भारतातील अस्पृयता ही धर्माधिष्ठित असून ती हिंदूधर्म, वैदिक धर्माने निर्माण केली आहे. तर इतर

देशातील अस्पृश्यता धर्माने केली नाही. त्यामुळेच भारतातील अस्पृश्यांना हजारो वर्षापासून अस्पृश्यतेचे परिणाम भोगावे लागत आहेत. ही अस्पृश्यता आजपर्यंत टिकून असून तिची दाहकता आजही समाज अनुभवत आहे.

वि.रा.शिंदे आपल्या भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या ग्रंथात आपले मत व्यक्त करताना म्हणतात की, अस्पृश्यता आणि त्या बाबतीत घडणा–या घटना कमी अधिक फरकाने सर्व जगभरच दिसून येतात. परंतु हिंदुस्थानात परजाती द्वेषातून राजकीय तथा सामाजिक कारणामुळे जास्त दीर्घ काळ अस्पृश्यता टिकून राहिलेली दिसून येते. त्यांचे मते अस्पृश्यता ही जाती द्वेष तथा वर्ण द्वेष आणि वृत्तमत्सर यामुळेच भारतात रूढ झाली.

अस्पृश्यता भारतात व्यक्तीच्या जन्मावरून ठरविली जाते. एवढेच नाही तर निरनिराळया धार्मिक शिकवणुकीच्या माध्यमातून जनसामान्यावर बिंबविण्यात येते. नव्हे तर ती लादली जाते. वास्तविक पाहता अस्पृश्यता केवळ जन्मावरूनच उत्पन्न झाली नाही आणि होतही नाही तर अतिशय पापदायक अपराध केल्यामुळेच काही लोक बहिष्कृत केले जात असत.

काणे यांचे मतानुसार अस्पृश्यता ही जन्माने ठरत नसून गुणकर्माने व्यक्तींवर लादली जाते. परंतु भारतीय समाजात ही अस्पृश्यता पारंपारिक काळापासूनच व्यक्तीला जन्माने दिली जाते. हे अस्पृश्यतेचे हस्तांतरण भारतीय समाजात पिढयानपिढया होत असून हजारो पिढया या अस्पृश्यतेच्या बळी ठरल्या आहेत. त्याची झळ आर्य अनार्य संघर्षापासून वैदिक कालखंडापासून तर आजच्या आधुनिक युगात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आदींच्या स्वरूपात भारतातील एका दुर्लक्षित समूहाला पोहचत असल्याचे दिसून येते.

वैदिकपूर्वकालीन समाजव्यवस्थेत आर्य अनार्य असे दोनच वर्ग अस्तित्वात होते. अनार्य हे आर्यांचे शत्रू मानले जात होते. या काळातही दास प्रथा होती. आर्यांनी अनार्यांवर आक्रमण करून पराजित अनार्यांना आपले दास, गुलाम बनवून त्यांचे आदान प्रदान व क्रय–विक्रय केला जात होता. कालांतराने दास्य पत्करलेल्या अनार्यांचा तत्कालीन समाज व्यवस्थेने वर्णव्यवस्थेतील चौथ्या वर्णात समावेश केला. परंतु ऋग्वेद काळात अनार्यांना आर्यांचे शत्रू मानले जात होते. हे विधान संयुक्तिक वाटत नाही, कारण अनार्य हे सिंधू संस्कृती येथील मूळ निवासी असून अर्यानीच त्यांच्यावर आक्रमण करून त्यांना पराजित केले.

जातिसंस्था हे भारतीय समाजरचनेचे एक प्रमुख लक्षण आहे. हिंदू समाजव्यवस्थेचे अंग आहे. लहानमोठे हजारो सामाजिक गट भारतात जवळ जवळ तीन हजार वर्षापासून एकमेकांच्या शेजारी राहत आहेत. परंपरेने चालत आलेले आपल्या जीवनशैलीचे वेगळेपण त्यांनी राखून ठेवले आहे. या सामाजिक गटांनाच जाती असे म्हणतात.

### *जात–एक स्वयंपूर्ण सामाजिक संस्था :–*

जात ही स्वयंपूर्ण सामाजिक संस्था आहे. जातीतील लोक सामान्यपणे एकाच व्यवसाय करीत आले आहेत. शतकानुशतके रूढ असलेले ठराविक नियम आणि संकेत ते पाळतात. विशेषतः रोटी–बेटी व्यवहारांसबंधी जातीचे रूढ असे अलिखित नियम आहेत. जातीतील लोक हे नियम अत्यंत कटाक्षाने पाळतात. एखाद्याने जातीच्या नियमांचे उल्लंघन केले तर जातीचे लोक त्याला जातीबाहेर काढतात. त्याच्यांशी कोणताही संबंध ठेवीत नाहीत.

बेटी–व्यवहाराच्या संदर्भात जातीतील अंतर्गत नियमांचे फारच काटेकोरपणे पालन केले जाते. हे आणि असे नियम म्हणजे एका जातीला दुस–या जातीपासून तोडणा–या भिंतीच आहेत. नियमांच्या या तटबंदीमुळे प्राचीन काळापासून जातीजातींतील समरसतेला फार मोठा अडथळा निर्माण झाला आहे. विचारवंतानी आणि समाजसुधारकांनी जातीगटातील या भिंती नष्ट करुन एकरस हिंदूसमाजनिर्मितीचे प्रयत्न वेळोवेळी केले. त्यांनी काहीवेळा कमी अधिक प्रमाणात यशही आल्यासारखे दिसले. तरीही जात ही सामाजिक संस्था चिवटपणे टिकून राहिली आहे.

डॉ. इरावती कर्वे यांनी जातीसंबंधी विवेचन करताना त्यांचे वर्णन विस्तारलेला नातेवाईकांच्या कुटुंबाचा असा गट की ज्यांच्यात विवाहसंबंध होऊ शकतो. असे म्हटले आहे. असे कुटुंबाचे समूह बहुद्या मर्यादित भागात आणि त्यातही एकभाषिक प्रदेशात राहतात. परंपरेने त्यांचे एक किंवा अनेक व्यवसाय असतात. इतर जातींच्या संदर्भात त्यांचे श्रेष्ठ–कनिष्ठ असे स्थान असते. डॉ. इरावती कर्वे यांनी जातीसंबंधी केलेले वर्णन कमी अधिक प्रमाणात भारतातील सर्वच जातिगटांना लागू पडते.

### *जात या संस्थेची उत्पत्ती :–*

जातिसंस्थेची उत्पत्ती कशी झाली हे निरनिराळ्या शास्त्रज्ञांनी आपल्याला परीने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. सिध्दांत मांडले आहेत. मात्र अजून कुणीही जातिसंस्था कशी निर्माण झाली यासंबंधीची सर्वमान्य कारणमीमांसा करू शकले नाही. ऋग्वेदात वर्णाचा उल्लेख आहे. काही व्यवसायवाचक संज्ञांचाही उल्लेख आहे. मात्र तेथे जातीचा उल्लेख नाही. जातीचा प्राचीन उल्लेख कुटुंब, कुल, गोत्र या अर्थाने प्रथम कात्यायन श्रौतसूत्रात आढळतो.

जातीच्या उत्पत्तींसंबंधी मानववंश शास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ यांच्यामध्ये एकमत नाही. वर्णकल्पना आणि जातिकल्पना यांची अनेकांनी गलत केली आहे. असेही दिसते. वर्ण हा शब्द वर्ग किंवा विभाग अशा अर्थाने वापरण्यात आला आहे. हिंदू समाजाचे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे जे चार वर्ग प्राचीनकाळी अस्तित्त्वात आले त्यांना वर्ण म्हणतात. त्यावर आधारित समाजव्यवस्थेला चातुर्वर्णीय समाज म्हणतात. वर्ण हा शब्द जातिवाचक नसून गुण व कर्मवाचक आहे. तो गुण व कर्म यावरून ठरतो.

### *भारतीय समाजव्यवस्था आणि जातिसंस्था :–*

प्राचीन काळापासून भारतात राहत असलेल्या विविध जाती–जमातींच्या एकत्र येण्यातून भारतीय समाजव्यवस्था निर्माण झाली. त्याचप्रमाणे भारतातील आणि बाहेरून आलेले अनेक समूह भारतीय समाजव्यवस्थेत सामावून घेतले. अशाप्रकारे नाना युगांत अनेकविध देशांतून आलेले जनसमूह भारतीय समाजव्यवस्थेशी एकरूप झाले. त्यांच्या भारतीय समाजात सामील होण्याला त्या त्या वेळच्या समाजसुधारणांनी प्रोत्साहन दिले. अशा प्रकारे निरनिराळ्या जातीजमातींचा समाजव्यवस्थेत समावेश होताना त्या जातीजमातींच्या आचार–विचारांचा प्रभाव परस्परांवर पडला. निरनिराळ्या साहचर्यातून इथल्या सांस्कृतिक विविधतेत एकसारखी भर पडत राहिली. जाती जमातींनी आपले वेगळेपण कायम टिकविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विविधता कायम राहिली. जातीजमतींचे साहचर्य व त्यामुळे त्यांचे परस्परांवर होणारे परिणाम यांतून हिंदू समाजाची घडण होत राहिली. सांस्कृतिक विविधतेत एकसारखी भर पडत राहणे. व समाजव्यवस्थेशी निरनिराळे जनसमूह एकरूप होणे, यांतून परंपरेने काही सांस्कृतिक विशेष निर्माण होऊन शतकानुशतके ते प्रवाही राहणे या क्रिया–प्रक्रिया घडल्या. स्विकार आणि समन्वय हे भारतीय समाजाचे किंवा हिंदू समाजाचे एक महत्त्वाचे लक्षण राहिले आहे. हिंदू समाजाची घडण होण्याची प्रक्रिया लक्षात घेतली तर जाती–जमातींचे समूहविशिष्ट निराळेपण आणि एकूण भारतीय समाजात किंवा हिंदू समाजात असलेली एकत्वाची निदर्शक तत्वे यासंबंधीचा उलगडा होईल.

भारतीय हिंदूंच्या सुमारे आठ हजार जाती असल्याचे सांगितले जाते. हिंदू सांस्कृतिक परंपरेप्रमाणे जीवन जगणा–यांच्या या जातींच्या शिवाय इतर धर्मीयांत देखील अनेकविध जाती आहेत. या सर्व जातींची मोजदाद करावयाची म्हटली तरी ते लवकर शक्य होत नाही.

### *समाज परिवर्तनासाठी समाजाच्या अभ्यासाची गरज :–*

स्वातंत्र्योत्तर काळात समाजात समता, लोकशाही ही नवी मूल्ये रूजविण्याच्या दृष्टिने धोरण आखताना त्याचप्रमाणे समतेवर अधिष्ठित संपूर्ण समाजाची पुनर्रचना करण्यासाठी कार्यक्रमाची आखणी करताना धोरण निश्चित करणा–यांनी त्याचप्रमाणे कार्यक्रम राबविणा–यांनी समाजाच्या मानसिकतेचा अभ्यास करणे आवश्यक होते. हा विशाल समाज ज्या जातींनी बनलेला आहे. त्या जातींच्या परस्परसंबंधांत बदल घडवून आणण्यासाठी, त्यांचे स्वरूप समजून त्याच्या स्वरूपांचा अभ्यास करणे आवश्यक होते. हे घडले नाही म्हणून स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाल्यानंतरही समाजजीवनात अपेक्षित परिवर्तन घडवून आणणे शक्य होऊ शकले नाही. समाजात ख–या अर्थाने परिवर्तन घडवून आणावयाचे तर जातींची अंतर्गत चालत आलेले सांस्कृतिक जीवन अभ्यासणे. त्यांची बलस्थाने शोधणे, त्यांच्यातील दोष जाणून घेणे, इतर जातींशी त्यांचे असणारे पारंपारिक संबंध लक्षात घेणे आवश्यकच नाही तर अनिवार्य आहे. यासाठी प्रत्येक जातीची माहिती घेतली पाहिजे. त्या जातींचे समाजजीवनातील स्थान काय यासंबंधी विचार केला पाहिजे. या सगळ्या बाबी त्यांच्यात कालसंवादी बदल घडविण्याच्या दृष्टिने महत्त्वाच्या आहेत. स्तरीय समाजाची पुनर्रचना करून समतेवर अधिष्ठित नवा समाज निर्माण करावयाचा असेल, त्यांच्यात समरसता निर्माण करावयाची असेल तर वर्तमानकालीन स्थितिगतींचे खोलवर अध्ययन करणे आवश्यक आहे.

प्रारंभीच्या काळात लवचीक असणारी वर्णव्यवस्था वैदिक काळ आणि उपनिषद काळामध्ये ताठर बनत गेली. वरच्या वर्णात जन्मलेला श्रेष्ठ माणूस कनिष्ठावर बंधने घालून त्यांना मूलभूत हक्कापासून वंचित ठेवत होता. अनेक अनिष्ठ प्रथांमुळे सर्वसामान्यांना जीवन जगणे असहाय झाले. तंत्र, मंत्र, जादू, टोणा विश्वास, तरण–मरण, जन्म, पुनर्जन्म यातून अनेक अंधश्रध्दा निर्माण झाल्या. अशा समाजव्यवस्थेत बौध्द धर्माचा उदय झाला. भारतातील काही जातींची माहिती पुढीलप्रमाणे :

***1.महार :*** अस्पृश्य जातीतील एक प्रमुख जात म्हणून महार जातीचा उल्लेख केला जातो. महार म्हणजे प्राचीन नाग होत, असे राजारामशास्त्री भागवत यांनी म्हटले आहे. डॉ. भांडारकरांच्या मते मेलेल्या जनावरांच्या वाहून नेणारी (मृत़हार) ते महार होत. केतकर प्रमाणेच अलेक्झांडर रॉबर्टसन आणि मोल्सवर्थ यांनी आपल्या  जीम डींजत थ्वसा या ग्रंथात म्हटले आहे की, गुर्जरांचे राष्ट्र ते गुजरात, शूरांचे राष्ट्र ते सौराष्ट्र त्याचप्रमाणे महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र होय. त्यामुळे महाराष्ट्र हे नाव महारांचे राष्ट्र यावरून पडले असावे. यावरून महार हे महाराष्ट्रातील मूळ रहिवाशी असून ते नागवंशीय आहेत. ही जात प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत राजकीय, प्रशासकीय व आर्थिक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची मानली जात असून त्यामुळेच या जातीला बावन्न हक्काची सदन मिळाली आहे आणि ती मोगलाई व राजस्थान, बंगाल, आसाम, ओरिसा इत्यादी सर्वच प्रांतात आढळत असून या जातीतील उपजातीचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल–सोमवंशीय, आंदवन, बावणे, बारके, कोसरे, लाडसी, सालवे, कथिये, झाडपे, डेहरे इत्यादी. ग्रामीण भागातील बारा बलुतेदारांपैकी महार एक होत. त्यांच्याकडे खेडेगावाच्या सरहददी सांभाळणे, चौकीदारी, गावकरी, वेसकरकी, कोतवालकी, जासुदी इत्यादी कामासोबतच पाटील., तलाठी यांचे सरकारी कागदपत्रे तालुके, पोलीस ठाणे येथे पोहचविणे, इत्यादी कामे महार जातीकडे होती, असे ग्रामीण समाजरचना या ग्रंथात म्हटले आहे. भारतातील जवळपास सर्वच प्रांतात ही जात जातीकडे होती, असे ग्रामीण समाजरचना या ग्रंथात म्हटले आहे. भारतातील जवळपास सर्वच प्रांतात ही जात आढळत असून प्रदेशानुसार या जातीला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते.

***2.मांग जात :*** मांग जात ही अस्पृश्य जातीपैंकी दुस–या क्रमांकाची प्रमुख जात आहे, ही जात केवळ महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गुजराथ, कर्नाटक, ओरिसा आणि राजस्थान इ. प्रत्येक राज्यात या जातीला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते ते पुढीलप्रमाणे :

| प्रदेश | नवे |
|---|---|
| महाराष्ट्र : (उस्मानाबाद, सोलापूर, सांगली, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, परभणी, बीड, कोल्हापूर, धुळे, नाशिक, नांदेड, जालना, बुलढाणा, अकोला, वर्धा, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ, वाशीम, काही प्रमाणात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी) | मांग / मातंग Mang/Matang |
| म्हैसूर | मादिग |
| गुजरात | मंगेले (Mangele) किंवा मंगेला (Mangel) |
| आंध्रप्रदेश | मांग किंवा Mang Garudi etc |
| कर्नाटक | मदिग (Madig) |
| ओरिसा | Mang Matang |
| दिव दमन | Minimadig |

याशिवाय आंध्रप्रदेश आणि राजस्थान या राज्यातही मांग ही जात आढळते. अशाप्रकारे विविध राज्यात ही जात असून ह्या मांग जातीचे आधिक्य प्रामुख्याने महाराष्ट्रात त्यातल्या त्यात विदर्भातील ग्रामीण भागात असलेले दिसून येते.

महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या परिसरातील 35 जिल्ह्यातील ग्रामीण भागातून ही जात कमी अधिक प्रमाणात आढळत असलेली दिसून येते.

***जाती अध्ययनाचा आढावा :–***

जगातील सर्वच समाजात वेगवेगळ्या स्वरूपात विषमता प्रचलित असली तरी विषमता या घटकांवर आधारलेल्या भारतीय जाती व्यवस्थेसारखी ताठर व्यवस्था जगाच्या पाठीवरील कोणत्याही समाजात दिसून येत नाही. वेदकाळातील रूढ असलेल्या वर्णव्यवस्थेनंतर (इ.स.पूर्व 300) स्मृतिकाळात जातिव्यवस्था दृढ होताना दिसून येते. जातीच्या उत्पत्तीसंबंधी विविध मतप्रवाह असून यासंबंधी विपुल प्रमाणात साहित्य उपलब्ध असूनही ही बाब संशोधकासमोर नेहमीच आव्हानच ठरली आहे. भारतीय जातिव्यवस्थेचा कालानुक्रमे विविध अभ्यासकांनी अभ्यास करून जातीची परिभाषा करण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासक्रमामध्ये अभ्यास करून जातीची परिभाषा करण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासकांनी केतकर (1909) सेनाट्र (1930) हर्टटन (1946)डॉ.धुर्ये (1964) योगेश अटल (1968) एन.के.दत्त (1963) लिंच (1969) सुनंदा पटवर्धन (1975) सच्चिदानंद (1977) विद्यार्थी मिश्रा (1977) इत्यादी अभ्यासकांचा उल्लेख करता येईल.

महाराष्ट्रात अस्पृश्यासंबंधी वि.रा.शिंदे (1933), त्रि.ना.अत्रे (1959), गारे व लिमये (1973) डॉ.बी.आर.आंबेडकर इत्यादींनी वेगवेगळ्या ग्रंथात अस्पृश्यासंबंधी विश्लेषण केले. महाराष्ट्रातील महार, मांग, चांभार, ढोर, आणि होलार अशा पाच प्रमुख अस्पृश्य जातीचा अभ्यास भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या ग्रंथात केला. (1933) गाववाडा यामध्ये त्रि.ना.अत्रे (1959), गारे व लिमये यांनी (1973) महाराष्ट्रातील दलित शोध आणि बोध यामध्ये, डॉ.सुनंदा पटवर्धन यांनी चेंज अमॉंग इंडियाज हरिजन्स या सर्व अध्ययनामध्ये मांग जातीचा अस्पृश्य जातीतील एक घटक म्हणून अभ्यास करण्यास आला. परंतु या मांग जातीसमूहाचा स्वतंत्ररित्या अभ्यास झालेला दिसत नाही.

मांग म्हणजे आजच्या सुधारणावादी समाजातील मातंग म्हणून गणली गेलेली जात. मांगाचा इतिहास तसा अत्यंत गौरवशाली व उच्च संस्कृती असलेला इतिहास आहे. परंतु मांगाचा इतिहास आजवर कोणत्याही इतिहासकाराने शोधून काढण्याचा प्रयत्न केला नाही. इतिहासकारांना त्याची आवश्यकता वाटली नाही. जर या जातीतील एखादा प्राचीन संस्कृतीचा संशोधक, इतिहासाचा अभ्यासक पुढे आला आणि अतिशय श्रम घेऊन त्याने जर मांगांचा इतिहास समोर आणला तर मांगांची अती प्राचीन संस्कृती पुढे येवू शकते.

मांग ही महाराष्ट्रातील हिंदू धर्मातील अस्पृश्य गणली जाणारी अनेक जातीपैकी एक जात म्हणून सध्या अस्तित्वात आहे. मांगानाच आज मातंग असेही संबोधले जाते. परंतु मांग व मातंग यांचा समन्वयार्थ वेगवेगळा आहे. मांग हा शब्द एक विशिष्ट जात–जमात या अर्थाने वापरण्यात येणारा शब्द आहे. परंतु मातंग हा एकेकाळी अत्यंत सभ्य व शांतताप्रिय असलेल्या संस्कृतीला निर्देशित करणारा असा शब्द आहे. मांग ही लोकसमुहाचा, जाती–जमातीच्या निर्देश मातंग म्हणून संबोधण्यात येवू लागले. मांग व मातंग या शब्दांचा अन्योन्य संबंध आहे.

मांग संस्कृतीचा उदय हा अती प्राचीन काळातील अत्यंत वैभवशाली मांगलीश वंशाच्या राजघराण्याचा संबंधित व निगडित असलेल्या समाज संस्कृतीतून झालेला आहे. या संस्कृतीची पाळेमुळे वेदपूर्वकालीन संस्कृतीत दडलेली आहेत. या वेदपूर्व संस्कृतीच्या काळात लहान–लहान खंडात विभाजीत अनेक मांगलीश राज्यकर्ते अस्तित्वात होते. अनेक वर्षे त्यांनी आपल्याला राज्यात राज्य केले. त्यांच्यात नेहमीच लढाया होत असत. या वंशातील राजे मांगल, मोगल, मांगलीश, मांगलपती, मंगलीया, मंग, अलमेलमंगाराज अशा अनेक नावांनी राज्यकर्ती जमात होती, या अत्यंत शूर व

लढवय्या राजांनी मांगल, मगध, किष्कींधा, कौसल, मातंग कूल अशा अनेक प्रदेशावर पिढ्यानं पिढ्या राज्य होते. या जमातीच्या लोकांचे कालांतराने मांगल, मंग, मांगलपती अशी अपभ्रंशीत नावे पुढे आलीत. पुढे याही शब्दांचा अपभ्रंश होऊन मंग, मॉंग अशा शब्दात त्याचे रूपांतर झाले. अशा प्रकारे मांग जातींचा मातंग या संस्कृतीशी संबंध जुळलेला आहे.

इतिहासाच्या मागोव्यावरून असे सिध्द झाले आहे की अनेक वैभवशाली राज्ये लढायामध्ये झालेल्या पराभवानंतर धुळीस मिळाली. त्यांची राज्ये नष्ट झाली. व त्यांची संस्कृती लयास गेली. नव्या जितांच्या नवनव्या संस्कृती या देशात उदयास आल्या. तसाच प्रकार या मांगलीश राज्यांच्या बाबतीत झाला आहे. या वैभवशाली, वैभवाधिष्ठित राज्यांच्या पराभवानंतर या पराजितांना कैद करून त्यांना गुलाम बनविण्यात आले. त्यांना सामाजिक गुलामगिरीत ढकलण्यात आले. त्यांना आर्य संस्कृती स्विकारलेल्या या जीतांच्या राजांनी आर्य संस्कृतीप्रमाणे चार्तुवण्यातील शुद्र वर्णात जबरीने टाकून दिले. शुद्रांना वर्ण हा समाजबाह्य अस्पृश्य या सेवेची कार्ये करणारा वर्ण होता. गुलामांना अशी सेवेची कार्ये देण्यात आली. या मांगलीश लोकांना पराभवानंतर त्यांना अस्पृश्यांनी अपवित्र घाणेरडी कामे आपल्या उपजिविकेसाठी करावी लागली. त्यांना अशी अत्यंजासारखी वागणूक देण्यात आली. या मांगलीशांना, शूर–वीर लढवय्यांना पुढे फारच दयनीय स्थिती प्राप्त झाली पुढे ते या आर्याच्या चार्तुवण्य संस्कृतीत निषिध्द वर्णातील एक वर्ण म्हणून अस्पृश्यांच्या जातीतील एक विशिष्ट जात म्हणून उदयास आली व त्यांची स्वतःची मातंग ही गौरवशाली संस्कृती नष्ट झाली.

***मातंग जात :–***

मातंग ही जात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश या गोवा आणि आसाम राज्यांमध्ये प्रामुख्याने आढळते. या जातीला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळी नावे आहेत. कर्नाटक आणि आंध्रप्रदेशामध्ये यांना मादिगा म्हटले जाते. महाराष्ट्रामध्ये मात्र ही जात महारांच्या सोबत ही जात आढळते. काश्मिरमध्ये आज मांगी ही जात आहे. ती जात भविष्य सांगण्याचे काम आजही करते. ही जात आजही भटक्या स्वरूपाचे जीवन जगत आहे. (शिंदे व्ही.आर.1976 पान नं. 104) अशाप्रकारे मांग ही जात भारतामध्ये विविध ठिकाणी पसरलेली दिसते.

बंगालमधील नामशुद्र आणि महाराष्ट्रातील मांग जातीच्या विविध अभ्यासावरून मरिआई ही देवता पृथ्वीमातेचे प्रतिक मानले जाते हे सिध्द होते. अलीकडील काळापर्यंत मांग जातीला चांडाळ संबोधले जात होते. हालिया ही मांगांची पोटजात आहे तसेच बंगालमध्येही नामुशद्र जातीची पोटजात हालिया ही आहे. मासे पकडण्याचा व्यवसाय करते. अशाप्रकारे महाराष्ट्रातील मांग आणि बंगालमधील नामशुद्र या एकाच जातकुळातील जाती आहेत असे मानले जाते त्यादृष्टीने अधिक संशोधन होणे गरजेचे आहे. मांग जातीचे मूळ दक्षिण भारतातील तुंगभद्रा नदीच्या काठावर सापडते. त्यामुळे ही जात महाराष्ट्रापासून तुंगभद्रा नदीपर्यंत आढळते.